**JANLOK PRATISHTHAN**
Office No. 40, Chourang Smitshilp, Manjari Road,
Mahadev Nagar, Hadpsar, Pune - 412 307.
Mob.: 9373172406, Email: janlokpratishtan581@gmail.com
Reg. No.: MH/581/2015/F46095, Pune
PAN NO.: AACTJ1377K; TAN No.: PNEJ09764G
**Website - http://janlokpratishthan.org**

**Sau. Sunanda Kadam** Chairman | **Shri. Ganesh Khandave** Secretary | **Shri. Kashinath Chavan.** Treasurer

जावक क्र. 472 /2020 दिनांक : १८.०७.२०२०

## ऑस्ट्रेलियातील फेडरल कोर्ट मध्ये जनलोक प्रतिष्ठानच्या क्लास ॲक्शन द्वारे सुरक्षित पी ए सी एल फंड पी ए सी एल गुंतवणुकदारांच्या परताव्यासाठी भारतात :

ही एक आनंददायी वार्ता आहे की जनलोक प्रतिष्ठान ने अपार मेहनतीने केलेल्या कारवाई मुळे ऑस्ट्रेलिया मध्ये अडकून पडलेला पी ए सी एल चा निधी १४ दिवसांच्या कालावधित संबंधित गुंतवणुकदारांच्या खात्यात पुनश्च हस्तांतरित करण्यासाठी लोढा समितीच्या खात्यात पाठवला जाईल. ऑस्ट्रेलियाच्या फेडरल कोर्टाच्या दिनांक ३ जून २०२० रोजी पारित करण्यात आलेल्या आदेशानुसार हा निधी पी ए सी एल गुंतवणुकदारांना त्यांचे पैसे परत देण्यासाठी वापरला जाईल.

जनलोक प्रतिष्ठान ही पुण्यातील ना नफा तत्वावर कार्य करणारी एक सामाजिक संस्था आहे. या संस्थेची स्थापना दिनांक १५ मे २०१५ रोजी सौ सुनंदा कदम यांच्या नेतृत्वाखाली श्री आबासाहेब रुपनार, श्री खांदवे, आणि श्री काशिनाथ चव्हाण तसेच श्रीमती शैला शिंदे, सौ विजया फुलावरे आणि श्री तेजस शिंगोटे यांच्या सहकार्याने करण्यात आली. पी ए सी एल गुंतवणुकदारांच्या जबरदस्त सहकार्याच्या सहाय्याने जनलोक प्रतिष्ठान ने सर्व पी ए सी एल गुंतवणुकदारांच्या वतीने आपल्या देशाच्या सर्वोच्च न्यायालयात याचिका डब्लू पी क्र. ६४०/२०१६ दाखल केली होती.

सन २०१५ मध्ये सौ कदम या मुंबईच्या एस ए टी न्यायालयात चालत असलेल्या पी ए सी एल विरुद्ध सेबी या खटल्यात उपस्थित राहिल्या. त्यावेळी त्यांना असे दिसून आले की पारित करण्यात आलेला आदेश जरी गुंतणुकदारांच्या हिताचा दिसत असला तरी त्यामुळे न्याय मिळण्यास विलंब

JANLOK PRATISHTHAN Reg 581/2015 F-46095 PUNE MANJARI BK



Kadam

जावक क्र. 472/2020

होईल आणि लोकांचे म्हणणे सुद्धा ऐकून घेतले जाणार नाही ही शक्यता प्रबळ होती. त्याच वेळी सौ कदम आणि त्यांच्या सहकाऱ्यांना असे स्पष्टपणे दिसून आले की सदर गुंतवणुकदारांच्या वतीने सुसंघटितपणे मोठ्या प्रमाणात कारवाई करण्याची खरी गरज आहे. खरे म्हणजे पी ए सी एल च्या गरीब आणि मध्यमवर्गातील गुंतवणुकदार लोकांना एकत्रित आणणे अतिशय जिकिरीचे काम होते कारण त्यांच्यापैकी अनेकांना हे सुद्धा ठाऊक नव्हते की कायदेशीर कारवाई कशा प्रकारे होईल. याबाबत त्यांच्या मनात अनेक प्रकारची संदिग्धता होती आणि कोणासही कसलीही माहिती नव्हती.

जानेवारी २०१६ मध्ये जनलोक प्रतिष्ठान यांना ऑस्ट्रेलियामधील एक निष्णात व अनुभवी वकील श्री नेलकोबर्न यांनी असे कळविले की भारतातील लहान लहान गुंतवणुकदारांचा पैसा वापरुन ऑस्ट्रेलिया मध्ये एम आय आय रिसॉर्ट विकत घेण्यात आले. सदर रिसॉर्ट विकून सुमारे १४७ दशलक्ष डॉलर्स वसूल झाले आहेत आणि ते लवकरच परत दिले जातील. परंतु पी ए सी एल गुंतवणुकदारांचे पैसे सुरक्षित ठेवण्यासाठी व ते लोकांना परत देण्यासाठी आवश्यक कायदेशीर कारवाई करणे खूपच जिकिरीचे आहे आणि ती करावीच लागेल.

जुलै २०१८ मध्ये निकालपत्र पारित करतांना ऑस्ट्रेलियाच्या फेडरल न्यायालयाने असे नमूद केले होते की श्री कोबर्न आणि त्यानंतर जनलोक ने सेबी बरोबर संपर्क केला. श्री कोबर्न यांनी या गोष्टीवर अधिक भर दिला की ऑस्ट्रेलियामध्ये पी ए सी एल ची मिळकत इकडे तिकडे होण्यास मज्जाव करण्यासाठी हे प्रकरण शक्य तितक्या लवकर मार्गी लागले पाहिजे. या दृष्टीने सेबी ला हे सुद्धा कळविण्यात आले की जर ते या प्रकरणात असफल ठरले तर जनलोक समुहाकडून ऑस्ट्रेलियामध्ये कायदेशीर कारवाई केली जाईल. दिनांक

JANLOK PRATISHTAN Reg.581/2015 F-46095 PUNE MANJARI BK

BKadam

**JANLOK PRATISHTHAN**
Office No. 40, Chourang Smitshilp, Manjari Road,
Mahadev Nagar, Hadpsar, Pune - 412 307.
Mob.: 9373172406, Email: janlokpratishtan581@gmail.com
Reg. No.: MH/581/2015/F46095, Pune
PAN NO.: AACTJ1377K; TAN No.: PNEJ09764G
Website - http://janlokpratishthan.org

**Sau. Sunanda Kadam** Chairman | **Shri. Ganesh Khandave** Secretary | **Shri. Kashinath Chavan.** Treasurer

जावक क्र.
472/2020

४ एप्रिल २०१६ रोजी जनलोक ने सेबी ला पत्र लिहून विनंती केली की ऑस्ट्रेलियामध्ये पी ए सी एल चा १४७ दशलक्ष डॉलर्स चा निधी गोठविण्यासाठी त्यांनी आवश्यक ती कारवाई करावी. त्याअगोदर सन २०१६ मध्ये गुंतवणुकदारांच्या वतीने जनलोक प्रतिष्ठान ने अनेकदा प्रयत्न केले. परंतु त्यांना या गोष्टीचे आश्चर्य वाटते की पी ए सी एल गुंतवणुकदारांचे पैसे परत मिळवून देण्याबाबत कायदेशीर कारवाई करण्याबाबत सेबी ने चक्क नकार दिला होता.

त्यानंतर जनलोक प्रतिष्ठान ने बळी पडलेल्या गुंतवणुकदारांच्या हितसंबंधासाठी वेगाने हालचाली केल्या आणि लोकांचा पैसा परत मिळवण्यासाठी त्यांनी दिनांक १३ जून २०१६ रोजी ऑस्ट्रेलिया मध्ये केस दाखल केली. सदर याचिके चे तक्रारदार होते सौ सुनंदा कदम आणि श्री आबासाहेब रूपनार. जेंव्हा ही कारवाई करण्यात आली त्यावेळी जनलोक जवळ ४५ हजार गुंतवणुकदारांची यादी उपलब्ध होती. जनलोक ने दिनांक १९ जून २०१६ रोजी यशस्वीपणे निषेधाज्ञेचा आदेश मिळवला. यामुळे पी ए सी एल गुंतवणुकीदारांसाठी सुमारे १४७ दशलक्ष डॉलर्सचा निधी ऑस्ट्रेलियन न्यायालयाने ट्रस्टच्या खात्यात ठेवला.

जुलै २०१८ मध्ये ऑस्ट्रेलियाच्या न्यायालयाकडून एक न्यायनिर्णय पारित करण्यात आला ज्यामध्ये असे कथन केले होते की, *"वरील कथनावरुन केवळ असा निष्कर्ष काढता येतो की मिराज च्या विक्रीतून आलेला निधी सुरक्षित करण्यासाठी तसेच सॅन्क्चुअरी कोव्ह प्रॉपर्टी चा व्यवहार थांबविण्यासाठी सौ कदम यांच्या वकीलांनी केलेल्या प्रयत्नांशिवाय या मिळकतींमध्ये गुंतवणुकदारांचा अडकविलेला पैसा बाहेर काढणे खूपच अशक्य कोटीतील होते. हे केवळ सौ कदम यांच्या प्रयत्नांमुळे शक्य झाले की या विवादित*

JANLOK PRATISHTAN Reg.581/2015 F-46095 PUNE MANJARI BK

BKadam

JANLOK PRATISHTHAN
Office No. 40, Chourang Smitshilp, Manjari Road,
Mahadev Nagar, Hadpsar, Pune - 412 307.
Mob.: 9373172406, Email: janlokpratishtan581@gmail.com
Reg. No.: MH/581/2015/F46095, Pune
PAN NO.: AACTJ1377K; TAN No.: PNEJ09764G
Website - http://janlokpratishthan.org

Sau. Sunanda Kadam
Chairman

Shri. Ganesh Khandave
Secretary

Shri. Kashinath Chavan.
Treasurer

जावक क्र.
472/2020

*अर्जाच्या सुनावणीनंतर एम आय आय रिसॉर्ट च्या करारात अशी तात्पुरत्या स्वरुपात जबाबदारी घेण्यात आली की मिराज किंवा विक्रीच्या रक्कमेचा अपव्यय केला जाणार नाही. त्यातच अधिक गोष्ट म्हणजे सॅन्क्चुअरी कोव्ह प्रॉपर्टी ला सौ कदम यांच्या वतीने काम करणारांनी एक कॅव्हिएट दाखल करुन सुरक्षित केले.*

सुमारे एक वर्षानंतर आता हा निधी गुंतवणुकदारांना परत करण्यासाठी तयार झाला होता तेंव्हा सेबी ने सदर निधी आपल्या नियंत्रणात घेण्यासाठी त्यामध्ये हस्तक्षेप केला ज्यांनी मागील २ वर्षे या प्रकरणाबाबत केवळ चालढकल केली त्यामुळे आणखी दोन वर्षाचा विलंब झाला. सेबीचा खटल्याचा सुमारे २ दशलक्ष डॉलर्सचा खर्च गुंतवणुकदारांच्या निधीतून करण्यात आला.

भारतात लोढा समितीने गुंतवणुकदारांच्या प्रक्रियेबाबत ज्या काही हालचाली केल्या त्याबाबत ऑस्ट्रेलियाच्या न्यायालयाने सेबीला विचारले. केवळ गुंतवणुकदारांच्या रेट्यामुळे सेबीकडे त्यांनी केवळ गुंतवणुकदार व त्यांच्या क्लेम्स चे तपशील मागितले. परंतु सेबी हे विवरण देऊ शकले नाहीत कारण त्या वेळेपर्यंत क्लेम्स ची संख्या व एकुण रक्कम सुनिश्चित करण्यासाठी त्यांनी कसलीच हालचाल केलेली नव्हती. परिणामी सेबी ला भारतात ऑनलाईन रिफंड पोर्टल सुरु करणे भाग पाडले व ते पोर्टल दिनांक ८ ऑगस्ट २०१९ रोजी कार्यरत झाले.

सेबी पोर्टल द्वारे गुंतवणुकदारांचे दावे नकारण्याच्या अनेक तक्रारी जनलोक कडे येउ लागल्या. त्यानंतर जनलोक ने सेबी पोर्टल शी संबंधित येणाऱ्या अनेक समस्यांबाबत विस्तृत सादरीकरण केले. शेवटी अनेक प्रकारे असफल ठरलेल्या प्रयत्नांच्या नंतर सेबी सोबत एक मिटिंग ठरविण्यास जनलोक ला यश आले.

JANLOK PRATISHTAN Reg 581/2015 F-46095 PUNE MANJARI BK

BKadam

JANLOK PRATISHTHAN
Office No. 40, Chourang Smitshilp, Manjari Road,
Mahadev Nagar, Hadpsar, Pune - 412 307.
Mob.: 9373172406, Email: janlokpratishtan581@gmail.com
Reg. No.: MH/581/2015/F46095, Pune
PAN NO.: AACTJ1377K; TAN No.: PNEJ09764G
Website - http://janlokpratishthan.org

Sau. Sunanda Kadam
Chairman

Shri. Ganesh Khandave
Secretary

Shri. Kashinath Chavan.
Treasurer

जावक क्र.
472/2020

बीकेसी मुबई येथील सेबी च्या कार्यालयात झालेल्या सदर मिटिंगमध्ये अनेक समस्यांचा उहापोह करण्यात आला. त्यावेळी समस्या सोडवण्याबाबत सेबीने वचन सुद्धा दिले परंतु बराच काळ लोटल्यावर सुद्धा सेबीने या दृष्टीने काहीही प्रयत्न केलेले नव्हते.

या कारणामुळे जनलोक ने ऑस्ट्रेलियन न्यायालयात ८ शपथपत्रे दाखल केली ज्यामध्ये सदर प्रकरणाचे गांभिर्य आणि सेबी रिफंड पोर्टल च्या संदर्भात येणाऱ्या अडचणींचे विवरण सादर केले होते. परंतु आजतागायत या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने कोणतीच हालचाल सेबी कडून करण्यात आलेली नव्हती व नाही. याउलट ऑस्ट्रेलिया च्या न्यायालयात यासंदर्भात आपल्या उत्तरात सेबीने असे सांगून हा मुद्दा उडवून लावला की, "सादर करण्यात आलेल्या गुंतवणुकदारांच्या अडचणी खूप लांबलचक आहेत" आणि "या अडचणी केवळ दंतकथा च आहेत". सेबी ने असे ही कथन केले की त्यांनी गुंतवणुकदारांना संधी दिली होती की त्यांनी आपल्या क्लेम्समध्ये झालेल्या चुका दुरुस्त करुन द्याव्यात ज्या दाखल केल्यानंतर पडताळून पाहण्यात आलेल्या नव्हत्या. तथापि गुंतवणुकदारांच्या त्या शपथपत्रात उपस्थित करण्यात आलेल्या मुद्दयांमुळे सुरुवातीला गुंतवणुकदारांपैकी एका खूप मोठ्या समूहाला आपला दावा नीट पंजिकृत करता आलेला नव्हता. त्यामुळे दुरस्तीसाठी दिलेली संधी त्यांच्या उपयोगाची नव्हती. ही समस्या सोडविण्याच्या दृष्टीने अनेक पी ए सी एल गुंतवणुकदारांनी सेबीच्या हेल्पलाईनशी संपर्क साधला परंतु त्याचा काहीच उपयोग होउ शकला नाही.

नुकत्याच दाखल करण्यात आलेल्या विवरणात सेबी ने हे सांगून आपलीच पाठ थोपटून घेतली की कोव्हिड महामारीच्या काळात त्यांनी पगारा व्यतिरिक्त खूपच काम केलेले आहे. परंतू सत्य हे आहे की असहाय गंतवणकदारांच्या समस्यांकडे

JANLOK PRATISHTAN Reg.581/2015 F-46095 PUNE MANJARI BK

BKadam

# JANLOK PRATISHTHAN

Office No. 40, Chourang Smitshilp, Manjari Road,
Mahadev Nagar, Hadpsar, Pune - 412 307.
Mob.: 9373172406, Email: janlokpratishtan581@gmail.com

Reg. No.: MH/581/2015/F46095, Pune

PAN NO.: AACTJ1377K; TAN No.: PNEJ09764G

**Website - http://janlokpratishthan.org**

**Sau. Sunanda Kadam** Chairman | **Shri. Ganesh Khandave** Secretary | **Shri. Kashinath Chavan.** Treasurer


जावक क्र. 472/2020

आणि त्यांच्या दाव्यांकडे सेबी ने सरळ सरळ दुर्लक्ष केले. दुर्दैवाने या कोव्हिड महामारीच्या काळात या असहाय गुंतवणुकदारांच्या समस्यांमध्ये अधिकच भर पडली.

पी ए सी एल मध्ये गुंतवणुकदारांनी आपला कष्टाने कमविलेला पैसा गुंतवल्यानंतर अनेक वर्षे भोगलेल्या त्रासाच्या संदर्भात जनलोक प्रतिष्ठान ने या पी ए सी एल गुंतवणुकदारांना पाठिंबा दिला हे सर्वश्रुत आहेच. या लोकांना आपला दावा योग्य प्रकारे दाखल करता येण्यासाठी त्यांना व्यवस्थित संधी मिळावी या भावनेने जनलोक पी ए सी एल डेटा नांवाचे एक रजिस्ट्रेशन पोर्टल जनलोक द्वारे ॲन्ड्राईड प्ले-स्टोअर वर लाँच करण्यात आले. याबाबत असे सांगण्यात आले की या पोर्टलवर आलेले सर्व दावे भारताच्या सर्वोच्च न्यायालयाकडे पाठविले जातील. अशा रीतिने जनलोकच्या जिल्हा आणि राज्यस्तरिय समितीने भारतभर केलेल्या अथक प्रयत्नांमुळे जनलोक ने हे सुनिश्चित केले आहे की कोणताही गुंतवणुकदार बाजूला पडणार नाही. अशा रीतिने जनलोक ने पी ए सी एल गुंतवणुकदारांच्या सहकार्याने सदर लढा नेटाने पुढे नेला. या लढ्यातून एक गोष्ट स्पष्ट झाली की जनलोक ने उभारलेल्या या कायदेशीर लढ्यातून जी पी ए सी एल गुंतवणुकदारांची रक्कम भारतात येत आहे ती लोढा समितीच्या आजवरच्या वसुलीपेक्षा खूपच जास्त आहे. यातून हे स्पष्ट झाले की जर सर्वांच्या सहकार्याने सातत्याने आणि संयमाने संघटितपणे आपले कार्य केले तर हमखास यश मिळतेच. हे उदाहरण जनलोक ने केवळ पी ए सी एल च्या गुंतवणुकदारांसमोरच नाही तर इतर अनेक कंपन्यांच्या पीडित गुंतवणुकदारांसमोर सुद्धा हे जिवंत उदाहरण ठेवेलेले आहे.

जर परदेशातून सुद्धा एखाद्या कंपनीने गुंतवलेला पैसा सनदशीर मार्गाने परत आणणे शक्य होत असेल तर आपल्या देशात कायदेशीर मार्गाचा अवलंब

JANLOK PRATISHTAN Reg.581/2015 F-46095 PUNE MANJARI BK

Kadam

**JANLOK PRATISHTHAN**
Office No. 40, Chourang Smitshilp, Manjari Road,
Mahadev Nagar, Hadpsar, Pune - 412 307.
Mob.: 9373172406, Email: janlokpratishtan581@gmail.com
Reg. No.: MH/581/2015/F46095, Pune
PAN NO.: AACTJ1377K; TAN No.: PNEJ09764G
Website - http://janlokpratishthan.org

| Sau. Sunanda Kadam
Chairman | Shri. Ganesh Khandave
Secretary | Shri. Kashinath Chavan.
Treasurer

जावक क्र.
472/2020

केल्यावर तर न्याय मिळेलच. भारतातील सर्व पी ए सी एल गुंतवणुकदारांच्या वतीने आम्ही लोढा समितीला विनंती करीत आहोत की भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचा आदर करीत सी बी आय ने पी ए सी एल ची जप्त केलेली मालमत्ता उचित दराने विकावी व सर्व गुंतवणुकदारांच्या समस्या लवकरात लवकर सोडवाव्यात. त्याचप्रमाणे सर्व पी ए सी एल गुंतवणुकदारांना जनलोक कडून आवाहन करण्यात येत आहे की त्यांनी आपले सर्व उर्वरित दावे जनलोकच्या पोर्टलवर मोठ्या संख्येने लोड करावेत जेणेकरुन त्यांच्यावर झालेला अन्याय सुद्धा लवकरात लवकर दूर करता येईल. पी ए सी एल चा गुंतवणुकदार हीच जनलोकची खरी ताकद आहे आणि त्यांच्या संपूर्ण न्यायासाठी जनलोक शेवटपर्यंत लढा देण्यासाठी वचनबद्ध आहे व राहील.

ही गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे की काही लोक सोशल मिडियावर दावा करीत होते की त्या लोकांनी दाखल केलेल्या शपथपत्रामुळे आस्ट्रेलियातून भारतात पैसे हस्तांतरित होणे शक्य झाले आहे. परंतु हे अगदी खोटे आहे. कारण ऑस्ट्रेलियन न्यायालयाच्या न्यायनिर्णयात व त्यांनी पारित केलेल्या आदेशात या व्यक्तिचे नांव कुठेही दिसून येत नाही. तसेच कोणत्याही संबंधित व्यक्तिने ऑस्ट्रेलियाच्या फेडरल न्यायालयात कोणतेही शपथपत्र कधीही दाखल केलेले नाही. शेवटच्या केसमध्ये ही व्यक्ती सहभागी झालेली नव्हती तसेच ती व्यक्ती या शेवटच्या केसचा भाग कधीच नव्हती आणि या गोष्टीचे स्पष्टीकरण ऑस्ट्रेलियन न्यायालयाने आपल्या आदेशात नमूद केलेले आहे.

त्याचप्रमाणे सोशल मिडियावर काही लोकांकडून एक बनावट बातमी प्रसारित केली जात आहे की ऑस्ट्रेलियाकडून भारतात रु.४२७ कोटी एवढी रक्कम हस्तांतरीत करण्यात आली आहे.

BKadam

JANLOK PRATISHTHAN Reg.581/2015 F-46095 PUNE MANJARI BK

**JANLOK PRATISHTHAN**
Office No. 40, Chourang Smitshilp, Manjari Road,
Mahadev Nagar, Hadpsar, Pune - 412 307.
Mob.: 9373172406, Email: janlokpratishtan581@gmail.com
Reg. No.: MH/581/2015/F46095, Pune
PAN NO.: AACTJ1377K; TAN No.: PNEJ09764G
**Website - http://janlokpratishthan.org**

**Sau. Sunanda Kadam** Chairman | **Shri. Ganesh Khandave** Secretary | **Shri. Kashinath Chavan.** Treasurer

जावक क्र. 472/2020

गुंतवणुकदार खरी परिस्थिती जाणून घेण्यास उत्सुक आहेत. म्हणून आम्ही हे जाहीर करीत आहोत की आपल्याला अंदाजे रु.३८५ कोटी रुपये (रु. ४२७ कोटी ही रक्कम आपल्याला मिळाली नाही) व्याजासह मिळाले आहेत जे पीएसीएल गुंतवणुकदारांना देण्यासाठी ऑस्ट्रेलियातून भारतात आलेले आहेत आणि ही गोष्ट फेडरल न्यायालयाच्या दिनांक ३ जून २०२० च्या आदेशात स्पष्टपणे नमूद करण्यात आलेली आहे.

या सर्व पार्श्वभूमिवर जनलोक ने सुरु केलेला लढा पुढे नेण्यासाठी सौ सुनंदा कदम यांच्या नेतृत्वाखाली मुख्य समितीमधील श्री आबासाहेब रुपनार, श्री खांदवे, श्री काशिनाथ चव्हाण, श्रीमती शैला शिंदे, सौ विजया फुलावरे, श्री तेजस शिंगोटे व श्री सुदाम भोसले त्याचप्रमाणे जनलोकच्या नॅशनल कमिटीतील सदस्य श्री सदाशिव बनकर, श्री दत्तात्रय गायकवाड, श्री सचिन कडलक, श्री रमेश सावंत, श्री संजय वालदे, श्री प्रशांत रामटेके, श्री संतुलाल भारती, श्री नगिनभाई पटेल, श्री के जे परमार, श्री मगर सर व श्री प्रमोद पाल तसेच राज्य महिला कृति समिती, तसेच जनलोकच्या सर्व राज्यस्तरिय कृती समित्या, जनलोकच्या जिल्हा कृती समित्या, जनलोकचे सर्व सभासद तसेच सर्व कायदेशीर सल्लागार त्याचप्रमाणे संस्थेचे असंख्य हितचिंतक आणि सर्वात महत्वाचे म्हणजे पी ए सी एल चे प्रचंड संख्येतील गुंतवणुकदार यांचे भरभरुन सहकार्य जनलोक ला लाभले. म्हणूनच मोठ्या अभिमानाने आम्ही हे कथन करीत आहोत की पी ए सी एल गुंतवणुकदारांच्या हक्कासाठी जनलोक ने सुरु केलेल्या या लढ्यात संपादन केलेल्या प्रचंड यशाचे शिल्पकार हे सर्व लोक आहेत.

JANLOK PRATISHTAN Reg.581/2015 F-46095 PUNE MANJARI BK

Kadam